पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ८
सभावृत्तांत

दिनांक - ०७/१०/२०१५ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०७/१०/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ **मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर – सभापती**
२ मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा.धनंजय मुरलीधर आल्हाट
४ मा.आशा रविंद्र सुपे
५ मा.चंद्रकांत (भाऊ) वाळके
६ मा.अनुराधा देविदास गोफणे
७ मा.जालिंदर (बापू) शिंदे
८ मा.श्रध्दा बाजीराव लांडे
९ मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१० मा.विश्वनाथ विठोबा लांडे
११ मा.संजय निवृत्ती आहेर – स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.क्षेत्रीय अधिकारी- श्रीम.आशादेवी दुरगुडे, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जयंत बरशेट्टी. (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा), मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.व्ही.सी.काळे – उपअभियंता, मा.श्री.वाघमारे एस.बी.- उपअभियंता, मा.श्री.व्ही.बी.माने, उपअभियंता, नगररचना, मा.श्री.बोरावके डी.एच. उपअभियंता, मा.कोंडे के.बी. उप अभियंता, (पाणीपुरवठा), मा.मनोज सेठीया – उपअभियंता, (जलनि:सारण) मा.शितोळे - उपअभियंता, (जलनि:सारण), मा.भोकरे रविंद्र- सहा.आरोग्य अधिकारी, मा.श्री.एस.बी.बगाडे – सहा.उद्यान अधिक्षक, मा.श्री.डी.सी.लोंढे –अतिक्रमण निरीक्षक, ), मा.श्रीम.प्रभावती मा.पाटील-पर्यवेक्षक, मा.शिराळ एस.डब्ल्यू – मुख्याध्यापक, मा.श्री.चव्हाण एच.एम. – मुख्याध्यापक, भोसरी, मा.श्री.व्ही.बी.राऊत – क.अभि.पाणीपुरवठा, मा.श्री.एम.ए.बगली - क.अभि.पाणीपुरवठा, मा.श्री.दिग्विजय पवार – कनिष्ठ अभियंता

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

**------**

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्रमांक १-** मौजे मोशी येथील स.नं. ४५४ पै (जुना ग.नं.४५२ पै.) या मिळकतीमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेबाबत. मा.मंदाताई उत्तम आल्हाट,मा.धनंजय आल्हाट यांचे पत्र.

**विषय क्रमांक** २ **–**प्रभाग क्र.६ लांडेवाडी भोसरी येथील पिं .चिं . मनपाच्या वतीने उभारण्यात येणा-या स्वागत कमानीस राजमाता जिजाऊ प्रवेशद्वार असे नामकरण करणेबाबत. मा. विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

**------**

अ**) दिनांक २/०९/**२०१५ **रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**-----**

ठराव क्रमांक- **१४** विषय क्रमांक- १

दिनांक- **७/१०/**२०१५

सूचक- मा.संजय आहेर अनुमोदक- मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ – मा. संजय आहेर, स्विकृत सदस्य यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संतनगर विभागात चौकांना खालीलप्रमाणे नावे देणे बाबत.

१) संतसाई चौक
२) हुतात्मा राजगुरु चौक
३) हुतात्मा बाबू गेनू चौक
४) भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुलकलाम चौक
५) श्रीराम चौक

नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले**

**------**

ठराव क्रमांक- **१५** विषय क्रमांक- १

दिनांक- **७/१०/**२०१५

सूचक- मा.मंदा आल्हाट अनुमोदक- मा.श्रध्दा लांडे

संदर्भ – मा.मंदाताई आल्हाट, मा.धनंजय आल्हाट यांचे पत्र

मौजे मोशी येथील ग नं.४५४ पै.(जुना ग. नं ४५२ पै.) मध्ये मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. प्रस्तावीत केलेल्या रस्त्यावर उत्तर – दक्षिण ग.नं.४५४ (जुना ग.नं. ४५०) मधील पेट्रोल लाईन ते पुणे ६०.०० मी. रस्त्यापर्यंत (टॉवर लाईन खालील) “ L ” आकारात

अस्तित्वातील रस्त्यावर नागरिकांचा वापर चालू आहे. सदर रस्ता वाहतुकीसाठी खूपच कमी पडत आहे. त्या ठिकाणी खूपच गर्दी होत आहे. त्यामुळे सदरचा रस्ता १२.०० मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०५ अन्वये (म्युनिसिपल रोड) रस्ता घोषित करणे आवश्यक आहे. सदरचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०५ अंतर्गत रस्ता घोषित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १६ विषय क्रमांक- २

दिनांक- ७/१०/२०१५

सूचक- मा. जालिंदर शिंदे अनुमोदक- मा.धनंजय आल्हाट

संदर्भ – मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने लांडेवाडी चौक येथे छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांचा अश्वरुढ पुतळा व रायगड दरवाज्याची भव्य प्रतिकृती उभारण्यात आलेला आहे. तसेच चौकाचे छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांच्या जीवनावर शिलालेख व शिवसृष्टीने चौकाचे सुशोभीरकरण करण्यात आले आहे. लांडेवाडी राजमाता जिजाऊ महाविद्यालय येथील रस्त्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या स्वागत कमानीस राजमाता जिजाऊ प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/४/कावि/ ५७७ /२०१५
दिनांक- २७/१०/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
( इ क्षेत्रीय कार्यालय)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दि.७/१०/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.धनंजय आल्हाट –** माझेकडे मोशीमध्ये ५० फुटावर कटाऊट आहे. आजूबाजूच्या लोकांची घरे दिसत नाही. अगदी शेजारी काम चालू आहे. मी एक हायकोर्टाचा वकील पाहिलेला आहे. मोशीमधील सगळी शुटींग केलेली आहे. हायकोर्टाचा आदेश आहे. तुम्ही सगळे संबंधित अधिकारी/कर्मचारी सस्पेंड व्हाल. सगळे रेकॉर्ड माझेकडे आहे. जनरल बॉडीमध्ये माझे प्रश्न आहेत. तुम्ही त्वरीत कारवाई केली नाही तर तुमची सगळयांची नोकरी जाणार आहे. अजून १०,१५ दिवस आहे, तुम्ही प्रत्येक अधिका-यांनी जरा विचार करा, सगळी बाब कायदेशीर आहे. मोशी विभागामध्ये अनधिकृत फ्लेक्स बोर्डस, जाहिराती मोठया प्रमाणावर लावल्या गेल्या आहेत त्याबाबबत नाराजी व्यक्त केली. सर्व बाबी जी.बी विचारणार आहे. आम्ही सगळेजण कोर्टात जाणार आहे. नोकरी वाचवायची असेल तर अनधिकृत फ्लेक्स बोर्डस, जाहिराती यावर त्वरीत कारवाई करा.

**मा.जालिंदर शिंदे -** प्रायव्हेट जागेवर टपरी असेल तर काही वाटत नाही. भोसरी उड्डाण पुलाखाली अनधिकृत व्यवसाय करणारे हातगाडीवाले, पथारीवाले, तीन चाकी वाहनातून व्यवसाय करणारे व्यवसायिक यांचेमुळे मोठया प्रमाणावर वाहतुकीस अडथळा होत आहे. तसेच बेकायदेशीर व्यवसाय देखील होत आहेत. त्यामुळे नागरीकांना नाहक त्रास होत आहे. भोसरी उड्डाण पुलाखाली बकाल वस्ती केलेली आहे. क प्रभागात बरे होते. एकच प्रभाग बरा होता.

**मा.धनंजय आल्हाट –** कुठलीच कामे होत नाही तर मिटींग कशाला लावायची. मिटींग घेऊच नका. आमचा लोकांच्या हितासाठी फायदा काय? आम्हाला काय पगार आहे का? फूटपाथवर सगळीकडे बोर्ड लावलेले आहेत. फेरीवाले फूटपाथ सोडून बसू दया. आमचे काहीही म्हणणे नाही.

**मा.जालिंदर शिंदे -** माझे इथे वॉर्डमध्ये नवरात्रचा कार्यक्रम आहे. त्याचा काही टॅक्स काही घेतलेला आहे का? तोंड पाहून चालले नाही ना.

**मा.प्रशासन अधिकारी -** होय मंडप परवाना फी वसुल केली आहे. निविदा करुन पेपरला जाहिरात देऊन करणार आहे. अटी शर्ती आणि त्या संबंधी माहिती घेण्यात येईल.

**मा.धनंजय आल्हाट -** फ्लेक्स बोर्डस, जाहिराती वर त्वरीत कारवाई करा. आताच तिकडे किती काम चालू आहे पाहिले तर लक्षात येईल. चार दिवस झाले काम चालू आहे. आम्हाला कारवाई करता येत नाही का? पण आम्हाला पैसे नको. आम्हाला असे काम नाही करायचे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** च-होली येथील शिल्पाचे काय झाले?

**मा.व्ही.सी.काळे – (उपअभियंता)** आता तेथे पाच मुर्त्या आलेल्या आहेत. त्यासाठी मान्यता मिळालेली आहे. शिल्पाचे काम करीत आहे.

**मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)** – मा.आयुक्त साहेबांनी घेतलेल्या आढावा बैठकीचा सभावृत्तांताचे वाचन केले व त्यानंतर मा.आयुक्त साहेब यांचेकडील आदेश क्र. फक्षेका/सभा/कावि/१६३/२०१५, दिनांक – १४/०९/२०१५ नुसार घेणेत येणा-या क्षेत्रीय सभेच्या नियमांचे वाचन केले. त्या अनुषंगाने सर्व सन्मा.सदस्यांना मा.आयुक्त साहेब यांचे क्षेत्र सभेबाबतच आदेश बजावणेत आले असलेबाबत समक्ष सांगितले व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मध्ये कलम २९ ब, कलम २९ क, कलम २९ ड व कलम २९ इ मध्ये क्षेत्रसभेबाबत तरतूद आहे. मा.सदस्य यांनी क्षेत्र सभेबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. व क्षेत्र सभा घेणे कायद्याने बंधनकारक असलेबाबत सर्व सन्मा. सदस्यांना सूचित करण्यात आले.

**मा.जालिंदर शिंदे –** नागरिकांनी प्रश्न विचाल्यावर त्यावर काही तरी कार्यवाही होणार आहे का? नागरीकांचे प्रश्न असेल तर नागरिकांचा क्षेत्रीय सभेत सहभाग असला पाहिजे. त्यांना बोलविले पाहिजे. पाच विभागांचे होणार आहे का?

**मा.चंद्रकांत वाळके –** माझे वॉर्डमध्ये रस्त्यावरील खड्डे बुजविणे, पाण्याची पाईप लाईन टाकणे, लाईट लावणेचे काम करणे असे आम्ही नगरसेवक नेहमी सांगत असतो. व तसे आम्ही संबंधीतास

काम करण्यास सांगतो. वॉर्डमधील लोक कित्येक दिवस वाट पाहतात. कोणीही काम करण्यास तयार नसतात. परंतू काही भागातील संबंधीत माणसे गेली की, त्यांचे काम हातोहात करण्यात येते. व तेथे अधिकारी जाऊन ते काम करतात. बी.यु.भंडारी यांचेकडील ड्रेनेज तुटलेले होते. त्यांनी संबंधीत अधिका-यांना आदेश केले की, लगेच तेथील काम करण्यात आले. असे जर असेल तर नगरसेवक कशासाठी असतात. माझे माहितीप्रमाणे दोन अधिकारी तेथे आलेले होते. अशा पध्दतीने कुणीही फोन केला तर कामे होत असतात. आम्हाला नागरीकांनी निवडून दिलेले असते. गेली ३०-४० वर्षे आम्ही राजकारणात आहे. आम्ही नियमानुसार काम करतो. चुकीचे काम करत नाही. माझे वॉर्डमध्ये असे न विचारता कामे केली तर पुन्हा सांगतो माझेसारखा वाईट कोणी नाही. मी जेवढा चांगला आहे, तेवढाच वाईट आहे. त्यामुळे माझेकडून एखाद्याला वाईट बोलले जाईल. तरी मी पुन्हा एकदा सांगतो माझे वॉर्डमधील मा.नगरसेविका सुपे मॅडम व मला विचारल्यावरच कामे करायची.

**मा.विश्वनाथ लांडे -** माझे येथे भगतवस्तीला झाडे कोणी लावली?

**मा.बगाडे (उद्यान)** – झाडे लावणेबाबत पत्र असल्यामुळे आम्ही ती झाडे लावली आहेत.

**मा.जालिंदर शिंदे -** भोसरीच्या पुलाखाली भाजी मंडईच आहे, ते अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी तुमची आहे. नगरसेवकाला विचारले का तुम्ही?

**मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) –** अतिक्रमण हटविण्याचे कामासाठी स्वतंत्र अतिक्रमण पथक नेमलेले आहे.

**मा.विश्वनाथ लांडे –** अतिक्रमणची कारवाई आपलेकडून का होत नाही. इंद्रायणीनगर प्रभागात काय चाललय बघा. सगळीकडे अतिक्रमण केले आहे.

**मा.Adv.नितीन लांडगे** – भोसरीमध्ये मोकळया प्लॉटमध्ये फुटपाथवर चिकनची टपरी नवीन झाली आहे.

**मा.संजय आहेर- स्विकृत सदस्य** – नवरात्रमध्ये स्वीटवाले आपली दुकाने सोडून २५ फूट पुढे येतात. अतिक्रमण विभागाकडून कारवाई झाली पाहिजे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** अतिक्रमण विषयक कामासाठी मनुष्यबळ कमी होते. सध्या अतिक्रमण विभागातील कर्मचा-यांची कामाची वेळ दु. १.०० ते रात्री ९.०० पर्यंत केलेली आहे.

**मा.Adv.नितीन लांडगे -** अतिक्रमण विषयक कामकाजाचे अधिकार कोणाकडे आहेत?

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – अतिक्रमण विषयक कामकाज करण्याकरीता मनुष्यबळ कमी आहे. कर्मचारी मिळण्याबाबत कळविले आहे.

**प्रशासन अधिकारी** – अतिक्रमण पथकाकरीता पथकप्रमुख व दोन मुख्य लिपीक, वाहनचालक व मजूर असा पथक असून यांचेकडून अतिक्रमण विषयक कारवाई पार पाडली जाते. सध्या नियंत्रीत अधिकारी म्हणून काम पाहात आहे.

**मा.जालिंदर शिंदे** – सर्व अनधिकृत टप-या काढून टाकण्याचे काम करणे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती** – वाळके साहेबांनी सांगितले तरच त्यांचे जे काम आहे ते करणे. तसेच प्रत्येक वॉर्डमधील सन्मा.नगरसेवकांनी काम सांगितल्यावरच वॉर्डमधील कामे करणे.

**मा.वाघमारे (उपअभियंता)** मा.वाळके साहेबांनी सांगितलेली कामे आम्ही केलेली आहेत. ठेकेदार यांना त्यांनी सांगितलेली कामे यापुर्वीच दाखविण्यात आलेली होती. व त्याप्रमाणे काम करण्याचे आदेश त्यांना देण्यात आलेले आहेत.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** कुठलेही कामे चालू करताना संबंधीत वॉर्डमधील सन्मा.नगरसदस्यांना कल्पना दिली पाहिजे.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.